# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 15 / 10 / 2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिरजगाव कसबा 358/2023 कलम 429 भा.द.वि. | सुरेश शामरावजी दातीर वय 49 वर्ष धंदा शेती रा. चुनुलाल महाराज मंदिर देऊरवाडा | नरेश देवराव दाभाडे रा. देऊरवाडा | नरेश दाभाडे यांचे शेताचे धुऱ्यावर देऊरवाडा शेत शिवार 7की.मी पूर्व | 12/10/2023 चे 04/00 वा. | 15/10/2023 चे 14/38 वा. | यातील फिर्यादी व आरोपीचे शेत एकमेकांचे शेताला लागून आहे नमूद घ.ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे शेतात गेले असता शेतातील मशीनची बटन चालू केल्यानंतर फिर्यादी पराटीला पाणी देत असताना फिर्यादी सोबत असलेली कुत्री ही फिर्यादीचे पुढे गेली व आरोपीचे शेतामध्ये गेली असता तिला करंट लागला असता ती मरण पावली आरोपी शेतमालक नरेश दाभाडे यांनी करंट लावल्याने एखाद्या जनावराला किंवा मनुष्याला शॉक लागून हानी होऊ शकते याची कल्पना असून सुद्धा आरोपीने त्याचे शेतात शेताभोवती करंट लावला त्यामुळे फिर्यादीची पाळीव कुत्री आरोपी ने शेतात लावून ठेवलेल्या इलेक्ट्रिक करंट चा शॉक लागून जागीच मरण पावली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 2 | दत्तापूर 550/2023 कलम 379 34 भा.द.वि. सह कलम 15 पर्यावरण संरक्षण अधिनियम | सर तर्फे उमेश मधुकरराव वाघमारे बक्कल नंबर 20 64 दत्तापूर | 1सिद्धार्थ कान्होजी मेश्राम वय 33 वर्ष 2 दिवेश सुनील बोरकर वय 22 वर्ष 3 विकी अशोक प्रसाद पांडे वय 33 वर्ष सर्व राहणार भिल्ली तालुका धामणगाव रेल्वे | नार गावंडी ते भिल्ली रोडवर दक्षिण पाच किलोमीटर | 15/10/2023 चे 00/15 वा ते 01/30 दरम्यान | 15/10/2023 चे 04/30 वा. | यातील नमूद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारांकडून खबर मिळाली की एक ट्रॅक्टर नांगर वाडी ते भीली रोडवर अवैधरीत्या रेती वाहतूक करीत आहे अशा खबरे वरून पंचायत समक्ष ट्रॅक्टर थांबविला असता सदर ट्रॅक्टर ट्रॉली मधील रेती 01 ब्रास रेती किंमत अंदाजे 6000/- रुपये व ट्रॅक्टर मुंडा सोनालिका कंपनीचा विना क्रमांकाचा किंमत अंदाजे 200000/- रुपये व ट्रॉली बिना क्रमांकाची किंमत अंदाजे 100000/- रुपये मोटर सायकल होंडा एम MH-27 CS-7385 किंमत अंदाजे 40000/- रुपये एकूण किंमत अंदाजे 346000/- रुपये पंच समक्ष जप्त करून ताब्यात घेतला अशा जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | कु-हा 336/23 कलम 324, 504,506,34 भा.द.वि. | जितेंद्र वासुदेव गिरासे<br>वय 45 वर्ष<br>रा. कारला<br>जि. अमरावती | इंद्रपाल बापूराव वैद्य 2. नरेंद्र महादेवराव भगत दोन्ही<br>रा. कारला<br>जि.अमरावती | ग्राम कारला 15 किमी पश्चिम | 15/10/2023 चे सकाळी 9/00 वा. दरम्यान | 15/10/2023 चे 13/25 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमूद घता वेळी व ठिकाणी फिर्यादीचे गाडीचा टायर पंचर झाल्याने त्याच्या गावातील प्रमोद मेहरे यांचे दुकानावर पंचर काढण्य करिता गेले होते पंचर काढून घरी परत जात असताना यातील दोन्ही आरोपी म्हणाले की तू माझ्या नावाचा रिपोर्ट का दिला या कारणावरून आरोपी क्रमांक एक याने फिर्यादीस लोखंडी पाणी सोडण्याच्या पाईपने उजव्या पायावर व उजव्या साईडला पाठीवर व तोंडावर मारले व मुका मार लागला तसेच आरोपी क्रमांक दोन यांनी पंचर दुरुस्त करण्याच्या रॉडने उजवे पायावर व पाठीवर मारून जखमी केले व शिवीगाळ करून जीवाने मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडिसर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता